RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १७७] बुधवार, डिसेंबर १७, २०२५/अग्रहायण २६, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५७९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आरटीआर-२०२१/प्र.क्र.११३/२१/मंउका.— भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून यापूर्वी अधिसूचित केलेले उपाहारगृहातील प्रमुख लिपिक, वरिष्ठ लिपिक, उपलेखापाल आणि वरिष्ठ भांडारपाल, गट-क या पदांचे सेवाप्रवेश नियम, १९९८ अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील उपाहारगृहांतील मुख्य लिपिक, गट-ब (अराजपत्रित), आणि वरिष्ठ लिपिक / उपलेखापाल / वरिष्ठ भांडारपाल, गट-क या पदांचे सेवाप्रवेश नियमांचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव आणि प्रारंभ :** या नियमांना “उपाहारगृहांतील मुख्य लिपिक, गट-ब (अराजपत्रित) आणि वरिष्ठ लिपिक/ उपलेखापाल / वरिष्ठ भांडारपाल, गट-क या पदांचे (सेवा प्रवेश) नियम, २०२५” असे संबोधण्यात यावे.

२. या नियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर :-

(क) “उपाहारगृह” याचा अर्थ महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व आहार/उपाहारगृहे ज्यामध्ये मंत्रालय उपाहारगृह, चौरस आहारगृह, विधानभवन उपाहारगृह आणि कोकणभवन उपाहारगृह यांचा समावेश आहे.

(ख) “पदोन्नतीसाठी पात्रता” म्हणजे शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी जारी केलेल्या नियम, ठराव किंवा आदेशामध्ये पदोन्नतीसाठी निर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार पदोन्नतीची पात्रता.

(ग) “सामान्य प्रशासन विभाग” म्हणजे भारताच्या संविधानातील अनुच्छेद १६६ अन्वये केलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या भाग पहिला मध्ये निर्दिष्ट शासनाचा विभाग.

(घ) “शासन” याचा अर्थ महाराष्ट्र शासन.

३. **उपाहारगृहांमधील मुख्य लिपिक, गट-ब (अराजपत्रित)** या पदावरील नियुक्ती उपाहारगृहांतील वरिष्ठ लिपिक / उपलेखापाल / वरिष्ठ भांडारपाल, गट -क हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून एकत्रित सेवाज्येष्ठता सूचीच्या आधारे ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

४. **उपाहारगृहांमधील वरिष्ठ लिपिक/उपलेखापाल/वरिष्ठ भांडारपाल, गट-क** या पदावरील नियुक्ती उपाहारगृहांतील लिपिक टंकलेखक/ लिपिक/ देयक लेखापाल/ लेखा लिपिक/ रोखपाल/ भांडारपाल , गट -क हे पद धारण करणाऱ्या तसेच सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून एकत्रित सेवाज्येष्ठता सूचीच्या आधारे ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने ;

५. नियम ३ व नियम ४ मध्ये नमूद पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेली असणे अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. अन्यथा नियम ३ व ४ येथील पदांवर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

६. नियम ३ व नियम ४ येथील पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, पदोन्नतीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अथवा शासनाने वेळोवेळी आदेशाव्दारे नमूद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा शासनाने वेळोवेळी आदेशाव्दारे निश्चित केलेल्या वयोमर्यादेनुसार संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील.

७. नियम ३ व ४ येथील पदावर नियुक्त होणारी व्यक्ती मंत्रालय उपाहारगृह, चौरस आहारगृह, विधानभवन उपाहारगृह आणि कोकणभवन उपाहारगृह या उपाहारगृहांतर्गत बदलीसाठी पात्र राहील.

८. शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी या नियमांव्दारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर नियमांनुसार शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास, शासकीय सेवेच्या कालावधीत, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, तसेच सेवा विषयक बाबी संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी अधिनियम / अधिसूचना / शासन निर्णय / शासन आदेशाव्दारे निर्गमित केलेले अन्य नियम लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चंद्रकांत कृष्णा मोरे,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 1st December, 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.RTR-2021/C.R.113/21/MCS.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of the Head Clerk, Senior Clerk , Deputy Accountant and Senior Store-keeper, Group-C in Canteen (Recruitment) Rules 1998, the Governor of Maharashtra is hereby pleased to make following rules regulating recruitment to the posts of Head Clerk, Group-B (Non-Gazetted) and Senior Clerk/ Deputy Accountant/ Senior Store-keeper, Group-C in Canteens under the General Administration Department of the Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the posts of Head Clerk, Group-B (Non-Gazetted) and Senior Clerk/ Deputy Accountant/ Senior Store-keeper, Group-C in Canteen (Recruitment) Rules 2025.

2. In the rules, unless context requires otherwise,—

(a) "Canteen" means all Canteens under the administrative control of the General Administration Department of the Government of Maharashtra including Mantralaya Canteen, Square Meal Canteen, Vidhan Bhavan Canteen and Konkan Bhavan Canteen;

(b) "Eligibility for Promotion" means the eligibility for promotion in accordance with terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time;

(c) "General Administration Department" means the Department specified in the First Schedule appended to the Maharashtra Government Rules of Business made under article 166 of the Constitution of India.

(d) "Government" means the Government of Maharashtra.

3. Appointment to the post of Head Clerk, Group-B (Non-Gazetted) shall be made by promotion of a suitable person, having eligibility for promotion and having not less than three years regular and continuous service on the post of Senior clerk or Deputy Accountant or Senior Store-keeper, Group-C, on the basis on common seniority, from amongst person holding the said posts.

4. Appointment to the post of Senior Clerk or Deputy Accountant or Senior Store- Keeper, Group-C shall be made by promotion of a suitable person, having eligibility for promotion and having not less than three years regular and continuous service on the post of Clerk-cum-Typist, Clerk, Bill Accountant, Account Clerk, Cashier and Store-keeper, Group C on basis of common seniority, from amongst the persons holding the said posts.

5. A person appointed to the post mentioned in rule 3 and 4 by promotion shall passed the Marathi and Hindi languages examinations as per rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said posts.

6. A person to be appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion shall possess a certificate of Computer Operations as per the rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said posts.

7. A person to be appointed to the posts mentioned in rules 3 and 4 shall be liable for transfer within Mantralaya Canteen, Square Meal Canteen, Vidhan Bhavan Canteen and Konkan Bhavan Canteen.

8. The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government Servant in any rules, orders or resolutions issued in this behalf by the Government, from time to time, shall also be applicable to the Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRAKANT KRISHNA MORE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.